# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

On the web
www.bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र
समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

सप्टेंबर, २०१४
वर्ष ३४, अंक ९


## अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,

सर्व वृत्त वाचकांना गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा! ह्यावर्षी मंडळांनी गणेशोत्सवासाठी वेगळे काय केले, ह्याचे आम्ही अनौपचारिकरित्या सर्वेक्षण केले. त्यात प्रामुख्याने पुढील तीन गोष्टी जाणवल्या. जास्तीतजास्त मराठमोळ्या पध्दतीने गणेशोत्सव साजरा करण्याचा मंडळांचा प्रयत्न होता. मग ते कार्यक्रम असो, पेहराव असो, जेवण असो, त्यात मराठीपण कसे जपता येईल, ह्यासाठी सर्वांचा प्रयत्न असतो. काही मंडळे अमराठी भारतीयांना आमंत्रित करून त्यांना आपल्या गणेशोत्सवात सामील करण्याचा प्रयत्न करतात. काही मंडळे जास्तीतजास्त मुलांना कार्यक्रमात कसे सामावून घेतले जाईल, यासाठी प्रयत्न करत असतात. एकंदरीत मंडळांच्या सर्व सदस्यांना एकत्र आणून त्यांना मंडळाच्या कार्यात कसे सामावून घेतले जाईल, हे बघितले जाते. सार्वजनिक कार्यक्रमातून समाज हा सशक्त आणि उत्साही होत असतो, हा लोकमान्य टिळकांचा सार्वजनिक गणेशोत्सवाचा हेतू सर्व मंडळे खऱ्या अर्थाने साध्य करीत आहेत.

फिलाडेल्फिया मंडळाच्या अध्यक्षा सौ. कोमल दाते, व फिलाडेल्फिया गणेशोत्सवाचे प्रमुख श्री मंदार जोगळेकर ह्यांनी मला दहा दिवसांच्या या उत्सवाच्या उद्घाटनास प्रमुख पाहुणे म्हणून बोलवल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. फिलाडेल्फिया मंडळ व तेथील सर्व भारतीय सामाजिक संस्था मिळून मोठ्या उत्साहाने व जल्लोषात दहा दिवस गणेशोत्सव साजरा करतात, हे पाहून मंडळ कार्यकर्त्यांचा अभिमान वाटला.



मंदार जोगळेकर, सुनील सूर्यवंशी

आमच्या कार्यकारिणीने जेव्हा बृ. म. मंडळाचा कारभार हाती घेतला, तेव्हा प्रांतिक पातळीवर चार/पाच मंडळांनी एकत्र येऊन कार्यक्रम करावेत, एकमेकांशी ओळखी वाढवाव्यात, स्थानिक कलाकारांना मोठा रंगमंच द्यावा, हे सर्व करताना आपल्या हृदयात असलेल्या महाराष्ट्राला जपावे, आपला वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावा, असा विचार मांडण्यात आला. त्या दिशेने आम्ही पाऊल उचलले, आणि त्याचे फलित म्हणजे ऑक्टोबर महिन्यात दोन ठिकाणी बृ. म. मंडळ महोत्सव होत आहेत. फ्लॉरिडामधील चार मंडळे मिळून ओर्लँडो येथे महोत्सव साजरा करत आहेत, त्याचबरोबर वॉशिंग्टन डीसी भागातील चार मंडळे मिळून तेथेही एक महोत्सव होतो आहे. तेथील मराठी प्रेमी आपआपल्या प्रांतात आलेल्या या संधीचा पूर्ण फायदा घेतील अशी मी आशा करतो.

मागच्या वर्षी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC)च्या अधिकाऱ्यांनी 'त्यांच्या महामंडळाचे व बृ. म. मंडळाचे उद्दिष्ट सारखेच असल्याने आपण एकत्र काम करायला हवे', असे सुचवले होते. त्याचाच एक भाग म्हणजे, यंदा आपण सप्टेंबर महिन्यात पाच ठिकाणी (न्यू यॉर्क, शिकागो, लॉस एंजलिस, मॉन्ट्रियाल, टोरांटो) होणाऱ्या 'रोडशो'मधे, महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे व मराठी संस्कृती ह्याबद्दल माहिती प्रसारित करीत आहोत, हे सांगायला विशेष आनंद होतो आहे.

कनेक्टिकटमधे "आम्ही बोलतो मराठी" हा एक छान चित्रपट बघायला मिळाला. त्यावेळी श्री विक्रम गोखले, चित्रपटाचे दिग्दर्शक श्री आनंद म्हसवेकर, व डॉ. मीना नेरूरकर यांचा चर्चेचा एक सुंदर कार्यक्रम बघायला मिळाला.



मीना नेरूरकर, विक्रम गोखले, सुनील सूर्यवंशी, आनंद म्हसवेकर

इंग्रजी भाषा ही महाराष्ट्रात कशी फोफावते आहे, व मराठी भाषेला कशी दुय्यम वागणूक मिळते आहे, ह्याबद्दल श्री गोखले यांनी खंत व्यक्त केली. 'मराठी भाषेला मानाचे स्थान मिळावे म्हणून आमचा प्रयत्न आहे, त्यासाठी अमेरिकेतील मराठी भाषा व संस्कृतीवर प्रेम करणाऱ्यांसाठी आम्ही महाराष्ट्राच्या आधी अमेरिकेत हा चित्रपट प्रदर्शित केला' असे श्री आनंद म्हसवेकर म्हणाले.

बृ. म. मंडळाच्या मराठी शाळेचे शिक्षक व विद्यार्थी यांनी नवीन शैक्षणिक वर्षाचा श्रीगणेशा केला. आनंदाची गोष्ट म्हणजे ह्यावर्षी शिकागोत नवीन मराठी शाळा सुरू होत आहे. लॉस एंजलिस अधिवेशनाला 'कॉर्पोरेट स्पॉन्सर्स'कडूनही चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे, कार्यक्रमांची निवड प्रक्रियाही लवकरच सुरू होईल, चांगले कार्यक्रम असतील, तर जरूर कळवावे. कळावे लोभ असावा.

**- सुनील सूर्यवंशी** (अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ)

## या अंकात ...


| | |
|---|---|
| बृ. म. मंडळ मराठी शाळा वृत्तांत, | २ |
| अमराठी भाषकांसाठी मराठी पाठ्यपुस्तक | |
| मराठी मंडळांतून फेरफटका, चित्रकल्पना | ३ |
| LAलकारी | ४ |
| मी विठ्ठल पाहिला? | ५ |
| कुणि भुइचाफा, कुणि नभजाई | ६ |
| पुस्तक परिचय | ८ |
| डॉ. वैशाली दीक्षित शुकर्ट यांना 'जीवन गौरव' पुरस्कार | ९ |
| उत्तररंग: | |
| ई विभाग: Kojaagari Magic, Kids' Corner, राशिभविष्य | १० |

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

**संस्थापक:** कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
सह-संपादक: वैभव पुराणिक, लॉस अँजलिस, कॅलिफोर्निया
संपादन-सल्लागार: मोहन रानडे, फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**
Mohan Ranade 144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com

**वर्गणीचे दर**
**Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
http://www.bmmonline.org/vruttasubscription

**जाहिरातीचे दर**
पूर्ण पान: $175  अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 65  अष्टमांश पान: $ 50

- वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या २५ तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो युनिकोड मराठीत MS word or Text File सह ईमेलने पाठवावा.
- प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील.
- पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.



**बृहन्महाराष्ट्रमंडळाची कार्यकारिणी (२०१३–२०१५)**
**मताधिकार असलेले सदस्य**
**मताधिकार नसलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:** | सुनील सूर्यवंशी | रिजफिल्ड, कनेटिकट |
| **सचिव:** | नमिता दांडेकर | टोरांटो, कॅनडा |
| **कोषाध्यक्ष:** | मोहित चिटणीस | सिॲटल, वॉशिंग्टन |
| **सदस्य:** | अमोल फुलांबरकर | वॉशिंग्टन डीसी |
| | अंजली अंतुरकर | डेट्रॉईट, मिशिगन |
| | नितीन जोशी | शिकागो, इलिनॉय |
| | सोना भिडे | फिनिक्स, ॲरिझोना |
| | प्रसाद पानवलकर | ऑस्टिन, टेक्सास |

**माजी अध्यक्ष:** आशिष चौघुले, होकेस्सीन, डेलावेअर
**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**मैत्र अध्यक्ष:** शिरीष सबनीस, डेट्रॉईट, मिशिगन

**विश्वस्त समिती:**
**अध्यक्ष:** गिरीश ठकार, पिट्स्बर्ग, पेन्सिल्वेनिया
**सदस्य:** मोरेश्वर पुरंदरे, बे एरिया, कॅलिफोर्निया
आशिष चौघुले, होकेस्सीन, डेलावेअर



**प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका**
**संकेत स्थळ :** http://www.bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.



**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठवण्याचा पत्ता:**
vinata@gmail.com or newsletter@bmmonline.org
Address for sending paper copy material:
**3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503**


# बृ. म. मंडळ मराठी शाळा वृत्तांत

मराठी शाळा हे एक कुटुंब झाले आहे. प्रत्यक्ष मोजकीच मंडळी मला भेटली आहेत, पण दर दोन महिन्याच्या नियमित होणाऱ्या दूरभाष बैठकीत शिक्षक, संचालक व सहाय्यक मंडळींशी संवाद साधताना खूप आपुलकी जाणवते. प्रत्येकजण अगदी मनापासून मुलांना मराठी शिकवायचे कार्य करीत आहे. नवीन उपक्रम तयार करीत आहेत. शाळेत येणारी मुलेदेखील आनंदाने सहभागी होत आहेत. स्थानिक अडचणी आहेत, पण एकजुटीने त्या पार पडत आहेत. डेट्रॉइट, ॲन आर्बर, सॅक्रमेंटो, ह्युस्टन, इंडियानापोलिस या शहरात मराठी शाळांचे वर्ग सुरू झाले आहेत. सप्टें.२०१३ते जून २०१४ या सत्रामधे एकूण ३८ शाखांतून ८७६ विद्यार्थ्यांनी मराठी शाळेचा फायदा घेतला.

बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि भारती विद्यापीठातर्फे संयुक्तपणे मराठी भाषेच्या परीक्षा झाल्या. मे – जून दरम्यान १९ शहरांतून एकूण ३९४ मुलांनी परीक्षा दिल्या. पहिली = १६५, दुसरी =९०, तिसरी =९६, चौथी =२८, पाचवी = १५. परीक्षा समितीने अभ्यासक्रमानुसार प्रश्नपत्रिका काढल्या. त्यांचे मन:पूर्वक आभार मानते. यावर्षी प्रथमच पहिली ते पाचवी पर्यंत परीक्षा झाल्या. सर्व मुले उत्तम श्रेणीत उत्तीर्ण झाले. शिक्षक वर्ग यांच्या निस्पृह योगदानाचे मापटे भर भरून कौतुक. सर्व शिक्षकांस धन्यवाद.

मराठी शाळेच्या पाच अभ्यासक्रमावर आधारित ई–पुस्तके करण्याचे काम संपत आले आहे. ई–पुस्तकांचे समन्वयक विनायक पर्वते आणि समिती यांनी घेतलेले परिश्रम वाखाणण्यासारखे आहेत. मागील दोन वर्षं दर रविवारी बैठकीत एकत्र जमून, विचार विनिमय करून, पाठ्य पुस्तकांचे लेखन करणे, परीक्षण करणे हे फार महत्त्वाचे काम पूर्ण केले आहे. ई–पुस्तक समितीला माझा मनापासून मानाचा मुजरा. त्यांचे शतश: आभार मानते.

ऑगस्ट २०१४ मधे चार ई–पाठ्य पुस्तकमाला प्रकाशित केली आहे.
अधिक माहिती– मराठी शाळा संकेतस्थळ:
http://bmmshala.net संपर्क: contact.bmmshala@gmail.com

**- सुनंदा टुमणे (बृ. म. मंडळ मराठी शाळा संचालिका)**

# अमराठी भाषकांसाठी मराठी पाठ्यपुस्तक

मराठी जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचावी, तिचा अमराठी भाषकांनी शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास करावा, यासाठी पहिल्यांदाच 'मायमराठी' हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाच्या पुढाकाराने हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवला आहे. प्रसिध्द चित्रपट–अभिनेता आमीर खान मराठी शिकला, हे सर्वश्रुत आहे. या प्रकल्पासाठी आमीर खानने २५ लाख रुपये देणगी दिली आहे. पुस्तकाचे प्रकाशन 'ग्रंथाली'ने केले असून 'लेव्हल १'च्या या पुस्तकात चित्र, गोष्टी, संवाद यांचा वापर केल्यामुळे ते अधिक बोलके झाले आहे. पुस्तकाचे आणखी पाच खंड प्रकाशित होणार आहेत.

# मराठी मंडळांतून फेरफटका



कॅलगरीच्या मराठी असोसिएशनचा गणेशोत्सव २९ ऑगस्टला पार पडला. या कार्यक्रमात बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या टॅलेंट ट्रान्सफर उपक्रमांतर्गत टोरांटोच्या नरेंद्र दातार आणि त्यांच्या चमूने आपला सुप्रसिद्ध 'स्वरगंध' हा संगीताचा कार्यक्रम सादर केला.

सिनसिनाटीच्या त्रिवेणी मित्र मंडळाचा कार्यक्रम ३१ ऑगस्ट रोजी साजरा झाला. ढोल ताशे आणि लेझीमच्या तालावर मिरवणुकीने गणरायाचे पालखीतून आगमन झाले. हिंदू टेंपल ऑफ ग्रेटर सिनसिनाटीमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला अंदाजे ९०० लोक उपस्थित होते. मागील वर्षाप्रमाणे यावर्षीही हिंदू स्वयंसेवक संघाद्वारे लहान मुलांसाठी 'माय गणेशा' हे वर्कशॉप घेण्यात आले.

डेट्रॉइटच्या महाराष्ट्र मंडळामध्ये गणेशोत्सवाचा कार्यक्रम यावर्षी ६ सप्टेंबरला असून त्यात ५ ते १८ वर्षामधील मुलांना आपली कला दाखवण्याची संधी दिली जाईल. या वर्षी 'तारांगण' असे नाव असलेल्या या कार्यक्रमात मुलांचा ऑर्केस्ट्राही सादर होणार आहे. या व्यतिरिक्त मुलांचे कला प्रदर्शन व डेट्रॉइटच्या मराठी शाळेतील मुलांचा खास कार्यक्रमही ठेवण्यात आला आहे.

कोलंबस महाराष्ट्र मंडळाचा गणेशोत्सवही ६ सप्टेंबरला असून यात लहान मुलांनी मंडळाच्या सहलीमध्ये बनवलेल्या गणेशमूर्तींचीचे प्रदर्शन मांडले जाईल.

महाराष्ट्र मंडळ बे एरीया (सॅन फ्रान्सिस्को) या वर्षी ७ सप्टेंबरला गणेशोत्सव साजरा करणार आहे. या कार्यक्रमात त्यांनी गणेशमूर्तींचे प्रदर्शन ठेवले आहे. अभिनव गोष्ट म्हणजे गणेशमूर्ती बनवण्याचे ऑनलाइन क्लासेस घेण्यासाठी हे मंडळ आपल्या सदस्यांना प्रोत्साहन देत आहे. पुण्यातील मंदार मराठे यांचे गणेशमूर्ती बनवण्याचे क्लासेस उडेमी डॉट कॉम वर उपलब्ध आहेत. या क्लासेसद्वारे मराठे पर्यावरणास घातक नसलेल्या मातीच्या मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण देतात. इतर मंडळांनीही या क्लासेसचा वापर करायला विचार करावा.

फिलाडेल्फिया तसेच ऑर्लॅंडोमधे गेल्या काही वर्षांच्या प्रथेप्रमाणे, यंदाही स्थानिक हिंदू मंदिरामधे मराठी तसेच अमराठी समूदायाचा दहा दिवसांचा गणेशोत्सव होत आहे. त्यानिमित्त सर्व वयोगटांसाठी सांस्कृतिक आणि सामाजिक प्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित केले आहेत.

कनेक्टिकट महाराष्ट्र मंडळात गणेशोत्सव यंदा १३ सप्टेंबरला वुडब्रिजच्या अमिटी हायस्कूलमध्ये साजरा होणार आहे. त्यात पुण्याच्या निश एन्टर्टेनमेंट संस्थेचा "पंचम – द इमॉर्टल नोट" हा आर. डी. बर्मन यांच्या संगीतावर कार्यक्रम होणार आहे. कनेक्टिकट मंडळाच्या प्रथेप्रमाणे यावर्षीही लहान मुलांकडून गणपती पूजन व अथर्वशीर्ष पठण केले जाईल.

कन्सास सिटीच्या महाराष्ट्र मंडळाचा गणेशोत्सवही १३सप्टेंबरला साजरा होत आहे. त्यात मराठी वर्गाची लहान मुले 'कालाय तस्मै नमः' हा कार्यक्रम सादर करणार आहेत. याच कार्यक्रमात 'प्रतिबिंब' नावाचे मुलांच्या गणेशविषयक कलाकृतींचे प्रदर्शनही भरवण्यात येणार आहे.

महाराष्ट्र मंडळ – लॉस एंजलिसचा गणेशोत्सवाचा कार्यक्रम यंदा ६ सप्टेंबरला आयोजित केला आहे. नेहमीप्रमाणेच गणेशमूर्तीचा विसर्जन सोहळा - हे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण



आहे. अनेक बसेसमधून लोकांना रेडांडो बीचला नेलं जाईल. तिथे वाजत गाजत, भगवे झेंडे घेऊन, लेझीमच्या तालावर गणेशमूर्तींचे विसर्जन केले जाईल.

**- वैभव पुराणिक** (लॉस एंजलिस)

# चित्र/कल्पना






**बृहन्महाराष्ट्र मंडळ १७ वे अधिवेशन**

**लॉस एंजलिस, जुलै ३ ते जुलै ५,२०१५**

**'मैत्र पिढ्यांचे जपे वारसा**

**कला संस्कृती मायबोलीचा'**

गणपती आणि मराठी संस्कृती ह्या दोन वेगळ्या गोष्टी नाहीत. त्या वेगळ्या करता येणं शक्यच नाही. निदान महाराष्ट्रात वाढलेल्या पिढ्यांसाठी तर नाहीच नाही. इथे वाढलेल्या पिढ्यांनाही वर्षातला तो एक दिवस नक्कीच लक्षात राहत असेल. लोकमान्य टिळकांनी ज्या उत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिलं, त्याचं आता हळूहळू आंतरराष्ट्रीकरण होत आहे. जसजशी मराठी लोकांची संख्या उत्तर अमेरिकेत वाढत जात आहे, तसतसं इथल्या गणेशोत्सवाचं स्वरूप मोठं होत आहे. १०००+ सदस्य गणेशोत्सवाला उपस्थित असणे ही निदान मोठ्या मंडळांमध्ये नेहेमीची बाब झाली आहे! अनेक महाराष्ट्र मंडळांनी इतर भारतीय लोकांबरोबर गणेशोत्सव साजरा करायला सुरुवात केली आहे. काही महाराष्ट्र मंडळे संपूर्ण दहा दिवस गणपती ठेवतानाही आढळतात. ज्यांना शक्य आहे अशी मंडळे वाजत गाजत विसर्जनही करतात. लॉस एंजलीसचे मंडळ त्यात अग्रणी आहे.

वेगवेगळ्या शहरात स्थापना होणाऱ्या गणरायाकडे वेगवेगळी गाऱ्हाणी मांडली जातील. लॉस एंजलीसची मंडळी ह्या वर्षी गणरायाला साकडं घालतील – "आम्ही हातात घेतलेलं काम खूप कठीण आहे. आम्ही ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करूच. पण तुझाही आशीर्वाद पाठी असू दे. वेळ जवळ येत चालली आहे. आता दहाच महिने उरले आहेत. हे कार्य नीट पार पडू दे." गणरायाचा आशीर्वाद मिळाल्यावर काय शक्य नाही? आणि कदाचित तो आशीर्वाद पाठीशी आहे म्हणूनच की काय, कार्यकर्ते कामाचे डोंगर उत्साहाने उपसत आहेत.

अशा या उत्साही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन आणि श्रमपरिहार म्हणून २ ऑगस्ट रोजी बेव्हर्ली हिलजवळ सहल व बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला कार्यकर्त्यांनी खूप मोठा प्रतिसाद



दिला. मंडळाचे अध्यक्ष सचिन सोनटक्के यांनी उपस्थितांचे स्वागत करून एकंदर रूपरेषा समजावली. अधिवेशनाचे संयोजक शैलेश शेव्ये, सहसंयोजक अजय दांडेकर आणि संजीव कुवाडेकर तसेच सल्लागार शशिकांत पानट, विद्या सप्रे हर्डीकर, गोपाळ मराठे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.



मुलांसाठी आणि मोठ्यांसाठी या बैठकीत वेगवेगळ्या खेळांचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात अनेक कार्यकर्त्यांचे वाढदिवसही केक कापून साजरे करण्यात आले. एकंदरीत पूर्ण दिवस भरपूर मजेत गेला. या बैठकीच्या आठवणी अनेक कार्यकर्त्यांच्या मनात बरेच दिवस घोळत राहतील यात शंकाच नाही.

अधिवेशन समितीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'सारेगम' स्पर्धेच्या चार शहरातील पात्रता फेऱ्यांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. ६ सप्टेंबरला ऑस्टिन, २० सप्टेंबरला न्यू इंग्लंड महाराष्ट्र मंडळात, ४ ऑक्टोबरला लॉस एंजलीसमध्ये तर ११ ऑक्टोबरला वॉशिंग्टन डीसीमध्ये 'सारेगम' पात्रता फेऱ्या पार पडतील. इतर शहरांच्या तारखाही लवकरच जाहीर होतील. दरम्यान उत्तर अमेरिकेतील कलाकारांच्या कार्यक्रमांचे अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख जवळ येत आहे. तुम्हाला आपला कार्यक्रम अधिवेशनात सादर करायचा असल्यास तुमचा अर्ज ३० सप्टेंबरपर्यंत समितीला मिळणे आवश्यक आहे. या अधिवेशनात प्रथमच समूहनृत्य स्पर्धा असणार आहे. त्यासाठीही प्रवेशिका नोंदवा. बृ. म. मंडळाच्या माध्यमातून विविध शहरांमध्ये मराठी शाळा चालवली जाते. या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठीही अधिवेशन बालकार्यक्रम समितीने स्पर्धा आयोजित केली आहे. त्याची माहिती खालील दुव्यावर: http://bmm2015.org/cultural-programs/bmm-marathishala/

३०सप्टेंबर ही अधिवेशन गीत स्पर्धेची प्रवेशिका स्वीकारायची अंतिम तारीख आहे. आपल्यातील संगीत उपासकांसाठी गीत स्पर्धेच्या रूपाने अधिवेशन समितीने एक मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. 'मैत्र पिढ्यांचे' या अधिवेशनाच्या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित गीत ध्वनीमुद्रित करून आपण अधिवेशन समितीला पाठवायचे आहे. यातून निवडलेले गीत अधिवेशनात वापरले जाईल. या व्यतिरिक्त अधिवेशनाच्या स्मरणिकेसाठीही लेख स्वीकारणे सुरू आहे. अधिवेशनाच्या वेबसाइटवर (bmm2015.org) या सर्व उपक्रमांविषयीची माहिती आहेच. अधिक माहितीसाठी संपर्क:

ईमेल: info@bmm2015.org , फोन क्रमांक: 310 - 776 - 5593

अधिवेशनामध्ये चांगली जागा मिळवण्यासाठीचा पर्याय अजूनही खुला आहे. देणगीदारांसाठी खास जागा राखून ठेवलेल्या आहेत. अधिवेशनाला देणगी देऊन चांगली जागा आणि टॅक्स डिडक्शन असा दुहेरी फायदा करून घ्या.

सरते शेवटी गणेशोत्सवाच्या निमित्ताने आपल्याला अधिवेशन समितीतर्फे हार्दिक शुभेच्छा. गणराय आपल्या मनोकामना पूर्ण करो, व आपले आयुष्य सुखासमाधानाने भरो हीच आमची त्याच्या चरणी प्रार्थना.

**- वैभव पुराणिक** (लॉस एंजलिस)

# मी विठ्ठल पाहिला?




होय, 'मी विठ्ठल पाहिला!'

'न्यू जर्सी' ते 'पंढरपूर'च्या माझ्या पहिल्या –वहिल्या वारीत, एकदा–दोनदा नव्हे, तर कैकदा मी विठ्ठल 'पाहिला', अनुभवला, कित्येक माऊलींच्या (माणसांच्या) रूपात! विश्वासच बसत नाही, की माझी पंढरपूरची 'पायी वारी' पूर्ण झाली.

अजून आठवतंय, वारी सुरू होण्यापूर्वी साधारणत: एक महिन्यापूर्वी (म्हणजे २०१४च्या मे महिन्यात), माझी येथील (अमेरिकेची) मैत्रीण **सौ. चित्रा भावे** हिच्याशी बोलणं झालं, आणि तिच्याकडून ऐकलं, की वारीसाठी ती भारतात जाणार आहे. '२६० किलोमीटर्स'चा 'आळंदी ते पंढरपूर' हा प्रवास पायी १८ दिवसात करायचा! म्हणजे सरासरी २०–२२ किलोमीटर्स दर दिवशी चालायचं; म्हणजे Half-Marathon walk दर दिवशी, तेही रोज सलग इतके दिवस! हे सगळं कुठेतरी खूपच उत्कंठापूर्ण वाटलं. अंतर्मनानी साद घातली, कौल दिला आणि आपणही यात भाग घ्यावा, अशी इच्छा निर्माण झाली. 'ठराविक चाकोरीतून न जाण्याचे स्वातंत्र्य' असलेल्या माझ्यातली राजश्री खडबडून जागी झाली. पण...


सौ. चित्रा भावे, सौ. राजश्री कुलकर्णी

खरंतर मी मूळची नागपूरची, आणि गेली अठरा वर्षे अमेरिकेत स्थायिक असल्यामुळे, माझा पालखी/वारीशी विशेष संबंध नव्हता; शिवाय मी नुकतीच भारतातून परत आले होते. भारताची ट्रीप सर्व बाजूंनीच खूप खर्चिक असते, पैसा आणि वेळ दोन्ही बाबतीत. आणि आता तर भारतातून आल्यानंतर, नवीन नोकरीची नुकतीच सुरुवात झाली होती. एक आठवडा खूप विचार केला; कुठेतरी वाचलेलं आठवलं, 'If it's till in your mind, then it's worth taking the risk'. माझ्या नवऱ्याने मला खूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, तुला वाटतं तेवढी ही गोष्ट सोपी नाही. पण का कुणास ठाऊक, अंतर्मनात खूप प्रबळ इच्छा होत होती. हा खडतर प्रवास असणार, एक–दोन नाही तर तब्बल अठरा दिवसांचा! खूप विचार केला, आणि माझ्या 'आतल्या मनाचं' ऐकायचं ठरवलं.

अमेरिकेतल्या न्यू जर्सीच्या आमच्या घरकुलात, आम्ही फक्त दोघेच आहोत. इथल्या या संसारात मागे लहान मुलं किंवा इतर जबाबदाऱ्या सध्यातरी नाहीत. आमचा एकवीस वर्षांचा मुलगा कौस्तुभ, कॉलेजच्या चौथ्या वर्षाला गेलाय, तोही उन्हाळ्याची सुट्टी असल्यामुळे होस्टेलमधून घरी आला होता. त्यामुळे त्याच्या बाबांना त्याची सोबत होती...शिवाय तब्येत सध्या ठीक आहे. सुदैवाने औषधपाणी काही नाही. चालायला जमतंय आणि मुख्य म्हणजे खूप इच्छा आहे; मग आता जाणार नाही तर कधी जाणार? अशी मीच माझ्या मनाची, मनातल्या मनात समजूत घातली.



माझ्या घरच्या दोघांची परवानगी मिळाल्यानंतर मित्रमंडळी, भारतातील सासरे आणि इतर नातेवाईक, इ. सगळ्यांना हळूहळू ही बातमी समजली. त्या सगळ्यांनाच खूप आश्चर्य वाटलं. काहींनी भुवया उंचावून तर काहींनी मोठा 'आ' वासून आश्चर्य व्यक्त केलं. 'माझं ऐकणार असशील तर जाऊ नको', पासून 'निव्वळ वेडेपणा आहे', पर्यंत नातेवाईक आणि मित्रमंडळींच्या मजबूत नकारात्मक प्रतिक्रीया ऐकल्या. माझ्या एका जिवलग डॉक्टर मैत्रिणीने तर रात्री दोन वाजेपर्यंत, 'मी का जाऊ नये आणि अस्वच्छतेमुळे शरीरावर कोणत्या थरापर्यंत दुष्परिणाम होऊ शकतात', यावर भाष्य केलं. "धूळ, गरमी, अस्वच्छता, एकत्र उघड्यावर जेवणावळी, सार्वजनिक शौचालये... यांचं सगळं तंत्र तू कसं जमवणार? भारतातल्याच लोकांना वारी झेपेल की नाही असं वाटतं, अन तू तर गेली कित्येक वर्षे अमेरिकेत स्थायिक आहेस."

त्यांचं बोलणं बहुतांशी खरं होतं, आणि त्यामागे असलेलं त्यांचं प्रेम आणि कळकळ मला जाणवत होती. पण का माहिती नाही, या सगळ्यांच्या नकारात्मक प्रतिक्रीया ऐकूनही, 'आळंदी ते पंढरपूर पायी वारी' पूर्ण करण्याचा माझा निर्धार कायम होता, किंबहुना सगळ्यांच्या नकारात्मक प्रतिक्रीया ऐकून, एका आंतरिक ऊर्मीने माझी इच्छाशक्ती जास्त प्रबळ होत गेली. There is a quote, which says, "A great pleasure in life is doing what people say you cannot do." It's so true!

"कुतुहल, उत्कंठा, उत्सुकता आणि साहस (Adventure) अधिक व्यवस्थापन (Management)" अशी माझी वारीची सुरुवात होती. लाखो वारकऱ्यांची सोय कशी करतात, व्यवस्थापना कशी होते, इ. बद्दल खूप उत्सुकता होती. न्यू जर्सीच्या 'मराठी विश्व' या मराठी मंडळाच्या कार्यकारी मंडळात असताना गणपती किंवा दिवाळी किंवा तत्सम मोठ्या कार्यक्रमांना किती तयारी लागते, हे मी अगदी जवळून अनुभवलं आहे. वारीच्या तुलनेत केवळ १२००–१५०० लोक आणि केवळ एका दिवसाचा कार्यक्रम असूनदेखील, कित्येक दिवस, कितीतरी स्वयंसेवक झटत असतात. त्यासाठी कितीतरी सभा, ईमेल्स, सोबतच रुसवे–फुगवे, समज–गैरसमजदेखील! मग वारीमधे इतक्या मोठ्या प्रमाणात, लाखो लोक जेंव्हा एकत्र येतात, तेव्हा ते इतके दिवस कुठे राहतात, त्यांची खाण्या–पिण्याची सोय कशी होते, कोण करतं?... अशा अनेक गोष्टींची खूप उत्सुकता होती.

'वारी'साठी भारतात जाण्याचं नक्की झालं. पुण्यातल्या नारायणपेठ मधील 'देशमुख दिंडी'मधे नाव नोंदवलं. (२६०० रू. भरले.) व्यवस्थापक राजाभाऊ देवळणकर यांनी प्रांजळपणे सगळ्या गोष्टींची पूर्वकल्पना दिली, आणि शांतपणे माझ्या सगळ्या शंकांचं निरसन केलं.


श्री लिमये श्री देवळणकर

“दररोज भरपूर चालण्याचा सराव ठेवा. सकाळी पाच-सहा वाजता (कधी कधी तर पहाटे ३-४ वाजता) उठून, थंड पाण्याने स्नान करावे लागेल. प्रात:र्विधीसाठी कमोड मिळणार नाही, कदाचित कधी बाहेरही जावं लागेल. झोपायला डोक्यावर छप्पर असेल, तंबूत रहावे लागणार नाही. धर्मशाळेत किंवा सार्वजनिक शाळांमधे (public schools) राहण्याची सोय होईल.” इतक्या मोकळेपणाने आणि उघडपणे सगळ्या गोष्टींची कल्पना दिल्यामुळे माझ्या मनाची तयारी झाली. एकदा ‘मनाची’ तयारी झाल्यानंतर, आता ‘बाकीची’ तयारी सोपी होती.

भारतात जाण्याचं तिकीट काढलं, आणि आता भारतात जाण्याची तयारी सुरू झाली. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे मलेरियाच्या गोळ्या, ‘टायफॉइड’ आणि ‘हिपॅटायटिस ए’ या प्रकारच्या लशी (vaccines), रोगप्रतिकारशक्ती वाढावी म्हणून घेऊन आले.

व्यवस्थापकांनी कार्यक्रमाचे माहितीपत्रक, वेळापत्रक आणि सोबत नेण्याच्या सामानाची यादी पाठवली. त्याप्रमाणे, भारतात नेण्याच्या सामानाची खरेदी सुरू केली. चालण्याचे उत्तम शूज (walking shoes), झोपण्याची वळकटी (Sleeping bag), टॉर्च, खाण्यासाठी लागणारे पण लवकर खराब न होणारे (चिवडा, लाडू, सिरीयल बार्स, सुका मेवा, बिस्किट्स, लाह्यांचा–मुरमुऱ्याचा चिवडा) पदार्थ, डासांसाठी ओडोमोस, वेट वाइप्स (wet wipes), सनस्क्रीन लोशन, रेनकोट, नेहमीची लागणारी औषधं,... अशी मोठ्ठीच्या मोठी खरेदी केली. भारतामधे उरलेल्या गोष्टी (बादली, वाटी, चमचा, चहाचा मग, कपडे वाळत घालण्याची दोरी,पावसाळी चपला... इत्यादी) खरेदी केल्या.




बघता बघता वारी सुरू होण्याचा दिवस उद्यावर येऊन ठेपला. सगळ्यात पहिला टप्पा होता, आळंदी ते पुणे! २८.५ किलोमीटर्स. आळंदीपर्यंत आम्ही गाडीने आलो.



(क्रमशः पुढील अंकात)

**- राजश्री कुलकर्णी** (न्यू जर्सी)

# कुणि भुइचाफा कुणि नभजाई

“कुणि भुइचाफा, कुणि नभजाई
कुणि काटेरी, सदाहरित कुणि,
संजीवक कुणि, कुणी विषारी
सर्वांची एकच वनराई!”

## जेनिफर ब्रिकर: अदम्य आशेचा प्रवास

"अनंत अमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला!" असे कुसुमाग्रजांच्या ‘कोलंबसचे गर्वगीत’ मधला नायक समुद्राला उद्देशून म्हणतो. त्याचा नीट अर्थ कळायला हवा असेल, तर **जेनिफर ब्रिकर** या अमेरिकन मुलीचे आयुष्य निरखावे. तिच्याबद्दल मला हाती आलेल्या एका फिरत्या व्हिडियो लिंकमधून प्रथम माहिती मिळाली. नंतर मी तिच्याबद्दल उपलब्ध असलेल्या सगळ्या व्हिडियो क्लिप्स पाहिल्या. एका आयुष्यातले अशक्य वाटणारे योगायोग, आणि जिद्दीच्या जोरावर कोण, काय आणि कसे यश मिळवू शकते, हे सगळे तिच्या कहाणीमधे आपल्याला दिसते.

जेन ब्रिकर. तरतरीत चेहरा. तेजस्वी टपोरे काळेभोर डोळे, आणि



काळसर सडक केस. टी. व्ही.वर मुलाखत घेणारीला स्वत:ची ओळख सांगताना, आपण ॲथलीट, ॲक्रोबॅट आणि एरियलिस्ट आहोत, असे ती सांगते. शिवाय ती उत्साहवर्धक भाषणेही देत असते. खेळाडू, कसरतपटु आणि एरियलिस्ट (म्हणजे अधांतरी टांगत्या दोराला धरून उड्या मारणारी, आणि उंचावरून जिम्नॅस्टिक खेळ करून दाखवणारी) अशी ही तरुणी आपल्या पुढ्यात येते, तेव्हा तिच्या उत्साही, हंसऱ्या चेहऱ्याच्या संमोहनात आपण बुडतोच. आणि नंतर कधीतरी आपल्या लक्षात येते, की या तरुणीला पाय नाहीत! काय? कसरतपटूला पाय नाहीत? होय. दोन्ही पायांना जिथून सुरुवात होते, तिथेच मांड्यांशी तिचे अंग संपलेले आहे!

हे कसे काय शक्य आहे? यामागची कहाणी म्हणजे सर्वसामान्य माणसांमधे तेवत असलेल्या जिद्दीचे, आणि अथक कष्टांचे मनाला उन्नत करणारे दर्शन. पायांशिवाय जन्माला आलेल्या या मुलीला तिच्या आईबापांनी जन्मत:च हॉस्पिटलमधे सोडून दिले होते. इलिनॉयमधे एका लहानशा गावात राहणाऱ्या शॅरन आणि जेराल्ड ब्रिकर या कनवाळू दांपत्याने तिला दत्तक घेऊन, आपल्या स्वत:च्या तीन मुलग्यांबरोबर तिलाही अतिशय मायेने सांभाळले, वाढवले. तिच्या या तिघा भावांनीही तिला भरपूर माया दिली. लहानपणापासून जे जे तिला करावेसे वाटले, ते ते तिला सर्व काही करायला मिळाले. फक्त एक शब्द तिला वर्ज्य केलेला होता, तो म्हणचे "Can't". अमुक एक गोष्ट मला जमणार नाही, एवढे मात्र म्हणायचे नाही, असे त्यांनी तिला शिकवले, आणि तिने खरोखरच ही शिकवण आत्मसात केली.

प्रथम काही दिवस श्रायनर्सच्या हॉस्पिटलमधून तिला लाकडी पाय देण्यात आले होते, आणि थोडा काळ तिने तेही सहन केले, पण त्यांत

तिला त्रासच अधिक झाल्यामुळे ते सोडून देऊन ती केवळ आपल्या मांडीपर्यंतच्या अर्ध्या शरीरानेच चालायला, पळायला, जिना चढायला, व्यायाम वगैरे सगळे काही करायला शिकली. लहानपणापासून तिला कसरतीचे सर्वात मोठे आकर्षण वाटे. वडिलांनी तिला ट्रॅम्पोलिनवरती उड्या मारायला आणि कोलांट्या उड्याही मारायला शिकवले. दोनचार वेळा पडल्यानंतर तिला ते करता येऊ लागले, मग ती आपल्या अर्ध्या शरीरानिशी कोलांट्या उड्यांच्या खेळात इलिनॉयमधली स्टेट चँपियन बनली. सॉफ्टबॉल, व्हॉलीबॉल वगैरे बाकीच्याही अनेक खेळात ती भाग घेत राहिली. एका व्हिडियोमधे बास्केटबॉलसारख्या खेळात ती ज्या पद्धतीने आपल्या मांडीच्या जोरावर पळत जाते, आणि बॉल हस्तगत करते, आणि कधीकधी बास्केटही गाठू शकते, ते पाहून अचंब्याने तोंडात बोट जाते आपले!

याच जिद्दीने जेनिफर वेगवेगळ्या पद्धतीच्या कसरती करायला शिकली. ऑलिम्पिकमधील कसरतपटु चॅम्पियन दोमिनिक मोचियानो ही तिची लहानपणापासून आदर्श आणि स्फूर्तिदेवता होती. वयाच्या १३व्या वर्षीच सर्वात लहान वयाची नॅशनल चॅम्पियन बनलेली, आणि ॲटलांटामधील १९९६च्या ऑलिंपिकमधे जिम्नॅस्टिक्समधे चौदाव्या वर्षी गोल्ड मेडल मिळवणारी, गोल्डन गर्ल दोमिनिक मोचियानो जेनिफरची अतिशय आवडती होती. तिच्यासारखी कसरत ती मनापासून करत असे. सोळा वर्षांची झाल्यावर एक दिवस जेनने आपल्या पालक–आईला विचारले, की आपल्या मूळ आईबापांबद्दल आपल्याला न कळलेले असे काही तपशील आहेत का? त्यावेळी तिला प्रथमच कळले, की तिचे मूळचे नाव मोचियानो हेच होते. जेनिफर थक्क झाली. आणि मग चार वर्षे शोध घेतल्यावर तर तिची खात्रीच झाली, की तिची लहानपणापासूनची स्फूर्तिदेवता दोमिनिक ही तिची सख्खी बहीणच असली पाहिजे.

तिने दोमिनिकला एक प्रांजळ पत्र लिहिले, आणि सोबत पुराव्याचे सगळे कागदपत्र, स्वत:चे फोटो वगैरे जोडले. पुरावा इतका बिनतोड होता, आणि फोटोमधील जेनिफर इतकी दोमिनिकच्या दुसऱ्या धाकट्या बहिणीसारखी दिसत होती, की दोमिनिकचीही खात्रीच झाली, की ही आपलीच सख्खी बहीण असली पाहिजे. तोवर दोमिनिक २६ वर्षांची विवाहिता झाली होती, आणि तिचे नऊ महिने भरले होते. पण तिला तिच्या आयुष्यात घडलेल्या या गुप्त प्रकरणाबद्दल काहीएक माहिती नव्हती. दोमिनिक ६ वर्षांची असतांना तिला ही बहीण झाली असली पाहिजे, आणि तिला काहीही आठवत नव्हते, म्हणून तिने आपल्या आईवडिलांना विचारले, त्यांनी कशीबशी कबुली दिली. खरोखरच ही मुलगी जे व्यंग घेऊन आली होती, त्यासह तिला वाढवण्यासाठी खूपच मेडिकलचा खर्च करावा लागेल, असं त्या दोघांना म्हणे त्यांच्या रोमेनियन डॉक्टरने सांगितले. नुकतेच अमेरिकेत येऊन हाताच्या पोटावर कसेबसे जगणारे ते स्थलांतरित रोमेनियन आईबाप त्या वैद्यकीय सल्ल्यामुळे गांगरले, आणि ते सगळं आपल्या आवाक्याबाहेरचं आहे, असं वाटून आपल्या नवजात बालकाला त्यांनी अडॉप्शनसाठी देऊन टाकलं. तिच्या वडिलांनीच हा निर्णय परस्पर घेऊन टाकला, आणि आईला मुलीला बघायलाही न देतां, जवळ घेऊ न देतां, तिला देऊन टाकण्यात आले. हे वृत्त कळल्यावर दोमिनिकला फार संताप आला, पण नंतर ती निवळली. दोघी बहिणी एकमेकींना भेटल्या. किती विलक्षण ही भेट झाली असली पाहिजे! कारण एकीकडे जेन ब्रिकरला लहानपणापासूनची आपली लाडकी स्फूर्तिदेवता प्रत्यक्ष दिसली, एवढेच नव्हे, तर ती सख्खी बहीणच निघाली आणि जन्मभरासाठी भेटली! आणि दोमिनिकच्या आयुष्यात तिला अजिबात माहीत नसलेली, तिच्याच आईबापांनी जिला टाकून दिले होते, अशी ही आगळीच धाकटी बहीण भेटली, आणि तीही तिच्याचसारखी कसरतपटू निघाली!

तिघी बहिणी एकमेकींच्या खूप जवळच्या झाल्या. जवळजवळ हजार मैल दूर वाढूनदेखील त्यांच्या बोलण्याचालण्यात हंसण्यात, आवडीनिवडीत, हस्ताक्षरातदेखील भरपूर साम्य आहे. पण दैवदुर्विलास असा, की ऑलिंपिकमधे यश मिळवणाऱ्या दोमिनिकचे लहानपण आपलाच हेका चालवणाऱ्या संतापी बापाच्या अवाजवी धाकामुळे आणि मारझोडीमुळे फारच त्रासदायक गेले होते, आणि वयात आल्यावर तिने कोर्टात जाऊन आपल्या आईवडिलांपासून स्वत:ला स्वतंत्र जाहीर करून टाकले होते. तरीपण काही काळानंतर ऑलिंपिकची स्पर्धा वगैरे सोडून देऊन ती विवाहित आणि घरसंसार करणारी झाली होती. आणि दुसरीकडे जिला एवढे मोठे व्यंग घेऊन जगायचे आणि शिवाय जिला जन्मत:च आईबापांनी टाकले, त्या जेनिफरला मात्र इतके चांगले दत्तक कुटुंब लाभले होते, की त्या दत्तक आईवडिलांच्या डोळस मायेत, अणि तीन चांगल्या भावांच्या सहवासात तिचे लहानपण मात्र फारच सुखासमाधानात गेले होते, आणि त्या खंबीर आधारामुळे आपल्या जन्मजात वैगुण्यावर सहज मात करून तिने आपल्या आवडीच्या क्षेत्रात स्वत:साठी स्थान निर्माण केले होते. लवकरच कॅन्सरने तिचे जन्मदाते वडील वारले, त्यामुळे जेनिफरला आपल्या वडिलांना भेटतां आले नाही, पण मूळच्या आईशी तिचे मनमोकळे संभाषण सुरू आहे. दोन्ही बहिणींनी आपल्या आईवडिलांची त्या काळची मजबुरी आणि निर्णय हे जमेल तेवढे समजून घेतले आहे आणि मूळ कुटुंबाचा असा शोध लागल्यामुळे आणि भावांबरोबर आता बहिणीही लाभल्यामुळे जेनिफर आनंदात आहे.


जेनिफर सध्या हॉलिवुडमधे स्वतंत्रपणे राहते आहे. आपल्या चाकांच्या खुर्चीत बसून ती फिरते, आणि खुर्ची उचलून गाडीच्या मागच्या सीटवर घालून स्वत: कार चालवूनही सर्वत्र फिरते. ब्रिटनी स्पीअर्स या नटीसह ‘सर्कस’ नामक सिनेमात तिने काम केले आहे. ती राष्ट्रीय मंचावर कसरतीचे आणि व्यायामाचे अनेक कार्यक्रम करून दाखवते, इतरांनाही ती कला शिकवते, आणि आपल्या वैगुण्यासह, पण त्याचा अजिबात बाऊ न करतां ती आपलं आयुष्य सर्वार्थाने जगते आहे. वैगुण्य असलेल्या आणि नसलेल्या सगळ्यांनीच तिच्या (नसलेल्या) पायांशी बसून आयुष्याचे धडे घ्यावेत असं मी म्हणेन.

**- विद्युल्लेखा अकलूजकर** (रिचमंड, ब्रिटिश कोलंबिया, कॅनडा)

# पुस्तक परिचय

## कवितानुवाद - एक अनोखा अनुभव

चांगल्या कवितांचा उत्तम अनुवाद करणं हे काम खरंच कठीण असतं. **दिलीप वि. चित्रे** हे स्वतः उत्तम कवी आहेत. म्हणूनच पन्ना नायक ह्यांच्या गुजराती कवितांचा मराठीत अनुवाद करण्याचं शिवधनुष्य त्यांनी सहजतेने उचललं.



दिलीप वि. चित्रे लिखित **'बहिष्कार'** हा पन्ना नायक ह्यांच्या १५० कवितांचा मराठीत केलेला सुंदर अनुवाद. 'पॉप्युलर प्रकाशन'ने नुकताच हा कवितासंग्रह प्रकाशित केला. १९७२पासून लिहिलेल्या वेगवेगळ्या सहा काव्यसंग्रहातून निवडलेल्या ह्या कविता, प्रथमच मराठीत भाषांतरित होत आहेत.

पुस्तकाच्या सुरवातीला दिलीप चित्रे ह्यांचं 'मनोगत' आहे, ते महत्वाचं आहे. अमेरिकेतल्या लेखक, लेखिकांचे पन्नासपेक्षा अधिक ग्रंथ निर्माण झाले असले, तरी त्या निर्मितीत कविता दुर्लक्षिली गेली, ह्याची जाणीव दिलीप चित्र्यांना आहे. ही एका कवीची खंत आहे. पन्ना नायक ह्यांच्या कवितांनी त्यांचं लक्ष वेधून घेतलं. ते म्हणतात, 'कवितेच्या वेगळेपणाने, धीटाईने, प्रामाणिकपणाने माझं लक्ष वेधून घेतलं. मग त्या कवितेचा मागोवा घेण्याचा छंदच लागला.' ह्या छंदामुळे मराठी वाचकांचा झालेला फायदा म्हणजे अनुवादित कवितांचा हा संग्रह.

'मी तळपती तलवार आहे,
सावध असा तुफानाची हीच खरी सुरवात आहे.'

असं म्हणणारी ही युगप्रवर्तक कविता खणखणत आली. दिलीप चित्र्यांच्या मते नारायण सुर्व्यांच्या कवितेसारखी क्रांतीचं गाणं गात आली. "आत्मनिष्ठ असून प्रदर्शनाचा आवेश आणि हव्यास नसणारी ही भावकविता आहे. त्यांच्या अभिव्यक्तीत विषाद जाणवतो, पण यत्किंचितही विखार नसतो." हे त्यांचं विधान कवितेबद्दल जवळीक निर्माण करतं.

ह्याच पुस्तकाच्या सुरवातीला पन्ना नायक ह्यांचं लक्षवेधी निवेदन आहे. "कसं काय कुणास ठाऊक, पण मी कॉलेजात होते तेव्हाच कवितेने माझ्या मनात गुपचूप घरटं बांधलं होतं." असं सहजपणे सांगणाऱ्या पन्ना नायक त्यांच्या कवितेत म्हणतात, 'लिहिणाऱ्या हाताला कवितेचा आधार नसता तर मी खरंच कोसळले असते.' 'माझा अनुभव हा जगाच्या पाठीवर कुठेही राहणाऱ्या स्त्रीचा सार्वत्रिक अनुभव असतो.'

'मला कुठल्याही लेबलांची पर्वा नाही. माझं धोरण एकच. ते म्हणजे, मी जे लिहिते आहे, ती कविता आहे की नाही, हे पहाणं. तिच्यात प्रामाणिकपणा आहे की नाही यावर नजर ठेवणं.'

त्यामुळेच त्यांची कविता आपल्याला अंतर्मुख करते. 'सरोवर', 'गुजगोष्टी', 'लायब्ररी', 'ऋण', 'पुन्हा एकदा', 'त्या माशानं', 'ऋणानुबंध' ह्या मला आवडलेल्या काही कविता.

'मुळीच म्हणत नाही', 'मर्म', 'मला जमतं', 'वेडेपणा' ह्या अनुवादित कविता इतक्या सुंदर आहेत, की मुळात त्या मराठीतच असाव्यात इतका सहजपणा त्यात आहे.

१) जग येवढं सुंदर असतं
हे मी शहाणपणानं तर कधीच अनुभवलं नाही
म्हणूनच
मला माझा वेडेपणाच जास्त आवडतो

२) फुलपाखराचं हे ऋण फेडण्यासाठी
आपण स्वतःच
फुलपाखरू कधी होणार?

३) मी होमसिक होते
वाटतं
इथलं सगळं आवरून घरी निघून जावं,
पण...
आता माझं घर कुठंय...?

४) आता मीच निघाले आहे
उशीरा का होईना पण
आई होऊ पाहणाऱ्या एखाद्या स्त्रीच्या गर्भात...
मूल बनण्यासाठी.

अशा सुरेख ओळी (वेगवेगळ्या कवितांमधल्या) वाचल्या, की मग पन्ना नायकांचं अनुवादासंबधीचं म्हणणं, 'मुळातल्या सौंदर्याची अभिवृद्धी होऊन अनुवादित कविता ओरिजिनल वाटाव्यात इतक्या सुरेख झाल्या आहेत,' मनापासून पटतं. दिलीप चित्र्यांनी केलेल्या अनुवादाला कवयित्रीने दिलेली ही खरी दाद आहे.

प्रेम, दूरावा, मृत्यू, मातृत्वहीनता, वियोग, समाजातील स्त्री-शोषण, दांभिकता इतक्या तऱ्हेतऱ्हेच्या भावभावनांचा आविष्कार ह्या कवितांमधे आहे. दिलीप चित्र्यांच्या अनुवादातली सहजता, तरलपणा, आशयाची आंतरिक सुसंगती, निवडलेले अचूक शब्द
(झुळकेचा झंझावात करू शकते मी
आणि नेऊ शकते समुद्राला
चांदण्यांच्या चरणांपर्यंत)

ह्या सगळ्यांमुळे 'बहिष्कार' हा काव्यसंग्रह अतिशय चांगला झाला आहे. सगळ्यात शेवटची कविता 'बहिष्कार', ही तर प्रत्येकाने वाचायलाच हवी. पन्ना नायक ह्यांच्या कवितालेखनाचा हा गाभा...
सारांश... कवितेचा शेवट चकित करणारा (आणि जरा विचार केल्यावर चकित न करणाराही... ) परंतु या सम हा.

एका कवितेत पन्ना नायक म्हणतात,
माझं म्हणता येईल असं माझं नाव नाही
माझा म्हणता येईल असा माझा पत्ता नाही

हे मात्र खरं नाही. हे शक्यच नाही. पन्ना नायकांचं नाव आणि पत्ता आमच्या मनात खोल शिरून राहिला आहे, कायम स्मरणात राहणार आहे. अनुवादाच्या निमित्ताने ह्या कवितांचं दालन आम्हाला उघडून दिलंत, म्हणून दिलीप चित्रे ह्यांचे त्रिवार आभार; अर्थातच पन्ना नायक ह्यांचेही, आणि त्यांच्या 'डोलणाऱ्या कवितेच्या मोरपिशी नौकेचेही'.

**- संध्या कर्णिक** (सॅन होसे, कॅलिफोर्निया)

## डॉ. वैशाली दीक्षित शुकर्ट यांना
### लॉरेल हायलँड्स हायस्कूल फाऊंडेशनतर्फे 'हॉल ऑफ द फेम' पुरस्कार

पिट्स्बर्ग (पेन्सिल्वेनिया) येथील लॉरेल हायलँड्स हायस्कूल अकॅडमिक फाऊंडेशनतर्फे दरवर्षी सात ते दहा माजी विद्यार्थ्यांना 'हॉल ऑफ द फेम' जीवन गौरव पुरस्कार देण्यात येतो. शैक्षणिक, व्यावसायिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांना हा पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी, ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आयोजित या पुरस्कार सोहोळ्यातील मानांकित यादीमधे, डॉ. **वैशाली (ऊर्फ राणी-** घरी, मित्र–परिवारामधे व हॉस्पिटलमधेही ती याच नावाने ओळखल्या जाते.) **दीक्षित शुकर्ट** (एमडी), यांचा समावेश आहे. (पिट्स्बर्ग, पेन्सिल्वेनिया येथे स्थायिक सौ. सुधा आणि डॉ. निरंजन दीक्षित यांची वैशाली ही मुलगी).



वैशाली १९८६मधे लॉरेल हायलँड्स हायस्कूलमधून ग्रॅज्यूएट झाली. शाळा व कॉलेजमधे अभ्यासाबरोबरच ती नृत्य (भरतनाट्यम्– अरंगेत्रम्), वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात कोरिओग्राफर, खेळ (Captain of Majorette -Baton twirling at school) संगीत (President of Quaker Notes - University of Pennsylvania's female singers group), काव्यलेखन अशा विविध क्षेत्रांतही चमकली. वैशालीचे पती मॅथ्यू शुकर्ट हे 'कार्डिओ थोरॅसिस सर्जन' आहेत. ह्या दांपत्याला तीन मुले (वय 15, 12, 10 वर्षे) आहेत.

वैशाली दीक्षित शुकर्ट ह्यांनी पेन्सिल्वेनिया विद्यापीठातून पदवी शिक्षण आणि पिट्सबर्ग विद्यापीठातून वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांना शल्य/सर्जरी विषयात स्टीफन बेहेन पुरस्कार व 'सर्जिकल क्रिटिकल केअर'साठी 'सर्जिकल इन्फेक्शन सोसायटी फेलोशिप अवार्ड' मिळाले. 'पिट्स्बर्ग युनिव्हर्सिटी मेडिकल सेंटर'मधील 'ट्रॉमा/क्रिटिकल केअर सेंटर'मधे कार्यरत डॉक्टर्समधे त्या पहिल्या 'महिला' सर्जन आहेत. 'ट्रॉमा/क्रिटिकल केअर' संबधित त्यांनी लिहिलेले दोन लेख विद्यापीठीय पाठ्यपुस्तकात समाविष्ट आहेत. विद्यापीठाच्या सर्जरी विभागात अनेक समितींवरही त्या सदस्य असून 'अमेरिकन कॉलेज ऑफ सर्जन्स'च्या फेलो आहेत.

लॉरेल हायलँड्स हायस्कूल अकॅडमिक फाऊंडेशनतर्फे 'हॉल ऑफ द फेम'– जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. वैशाली दीक्षित शुकर्ट यांचे अभिनंदन!

**- विनता कुलकर्णी**

## उत्तररंग

उत्तररंग हा बृहन्महाराष्ट्र मंडळाचा एक विभाग आहे. आयुष्याच्या उत्तरार्धातील जीवन आनंदी, समाधानी, आणि क्रियाशील रहाण्यासाठी काय करता येईल याचा विचार करण्यासाठी हा विभाग आहे. गावोगावी परिषदा, मेळावे आयोजित करण्यास मराठी मंडळांना उत्तेजन देणे, मदत करणे, वृत्तातून माहिती व लेख प्रसिद्ध करणे असे काही उपक्रम सुरू आहेत. २०१३च्या अधिवेशनात उत्तररंग नामदर्शिका प्रसिद्ध झाली आहे. त्यात ५५च्या वरील वयाच्या मराठी लोकांची माहिती आहेच. पण विविध विषयावरील लेख व माहितीही आहे. उत्तररंग हे सदर वृत्तात दर महिन्याआड प्रसिद्ध होते. हे सदर म्हणजे आपले विचार व्यक्त करण्यासाठी, माहिती देण्यासाठी, असलेले व्यासपीठ आहे. तेव्हा आपले लेख, माहिती व प्रतिक्रिया *ashoksapre@gmail.com* या ईमेल पत्त्यावर पाठवाव्या.

### वॉशिंग्टनमधील अग्रणींचा रंगलेला उत्तररंग

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वतीने आम्ही गावोगावी जाऊन उत्तररंग मेळावे घेत असतो. यंदाचा पहिला मेळावा २०एप्रिलला झाला. आयोजक होते वॉशिंग्टनचे "अग्रणी" विजय देशपांडे आणि त्यांचे सहकारी. कार्यक्रम होता अमोल फुलम्बरकर यांचे घरी. अग्रणी लोकांचा कार्यक्रम. तेव्हा दारावर टक टक केल्यावर साठीतले गृहस्थ दार उघडतील अशी कल्पना; तर तरतरीत तरुण अमोल आणि त्याची दीड वर्षाची कन्या स्वागताला आले. केवळ बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीवर असल्यामुळे कर्तव्यबुद्धीने केलेले ते स्वागत नव्हते. तर अत्यंत प्रेमाने, आपुलकीने सर्वांना आपल्या घरी बोलावून, जेवू खावू घालून, कार्यक्रम आयोजित करण्याचा घाट अमोलने घातला होता; दुसऱ्या दिवशी भारतात सुट्टीला जाण्याची गडबड असताना! या सभेत स्वत: सर्व वेळ थांबून चर्चेत भाग घेण्याचा अमोलचा उत्साहही लक्षात घेण्यासारखा.

आम्ही या उपक्रमाची माहिती सांगितली, आम्ही तयार केलेली "निवृत्ती नियोजन यादी" (retirement planning checklist) दिली आणि नंतर चांगला परिसंवाद झाला. आपापल्या भागात असे उत्तररंग गट सुरू करण्याची इच्छा असणाऱ्या वाचकांना माहिती असावी, यासाठी परिसंवादाचा सारांश पुढे दिला आहे:

**स्थानिक पातळीवर या गटाला काय करता येईल?**

१. जरी मराठी मंडळाने पन्नाशी पुढच्या लोकांसाठी उपक्रम आणि कार्यक्रम केले, तरी मंडळाच्या तरुण कार्यकारिणीला या वयाच्या लोकांना काय हवे, त्याची कल्पना येत नाही. तेव्हा या वयोगटाच्या कोणीतरी व्यक्तीने जबाबदारी घ्यावी लागते. आपला ज्याला इंग्रजीत champion म्हणतात तसा कोणी आधारस्तंभ पाहिजे. मग आपले स्थानिक प्रश्न आपल्याला सोडवता येतील.

२. लोकांना आजारीपणात मदत करणे. घरातील आजारी वा अपंग माणसाची देखभाल म्हणजे 'Caregiving' करण्यासाठी

मनाची तयारी वा खंबीरपणा लागतो. कधी कधी खास प्रशिक्षणाची आवश्यकता असते. याची माहिती मिळवणे, गटचर्चा वा प्रशिक्षण आयोजित करणे असे उपक्रम स्थानिक गटाला करता येतील. ५५ पेक्षा जास्त वयाच्या लोकांसाठी ज्या वसाहती असतात तिथे खास "Sunshine committee" असते. तशी आपली काही समिति गावोगावच्या "अग्रणी", "विरंगुळा" "५५ प्लस क्लब" सारख्या मराठी भारतीय लोकांना करावी लागेल.

३. एकंदरीत 'नेटवर्किंग', आधार गट (सपोर्ट ग्रुप) निर्माण करण्याची गरज आहे.

४. शहर, कौंटी भागातील सरकारी योजनांची माहिती काढून आपल्या गटाला व गावातील आपल्या वयाच्या लोकांना त्या योजनांचा फायदा कसा करून घेता येईल ते पाहणे. निवृत्ती माहिती पुस्तक अथवा "Retirement manual" तयार करण्याची कल्पना श्री आनंद बर्वे यांनी सुचवली.

५. या वयातील सेवानिवृत्त लोकांना मोकळा वेळ काढता येतो. या मोकळ्या वेळाचा चांगला उपयोग कसा करता येईल, याचा विचार करणे: उदा: अग्रणीचे काही सभासद तेथील "आशा" नावाच्या संस्थेचे स्वयंसेवक आहेत. पुष्कळ वेळा नोकरी, मुले यामध्ये तारेवरची कसरत करणाऱ्या तरुण मराठी लोकांना मदत लागते. अशा वेळी आपल्या मराठी मंडळातील तरुण लोकांना कशी मदत करता येईल त्याचा विचार करणे, वा आपल्याला असलेल्या मोकळ्या वेळेचा चांगला उपयोग करणे.

६. दोघांपैकी एकजण राहण्याच्या शक्यतेला कधीतरी सामोरे जाण्याची वेळ येतेच. तेव्हा आपल्या स्थानिक समाजातील एकट्या पडलेल्या लोकांना मदत, मानसिक आधार, आणि कदाचित जोडीदार शोधण्यासाठी मदत करणे.

**'उत्तररंग' किंवा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या पातळीवर काय करता येईल?**

याबद्दल आम्ही सांगितले की, "हे काम एक/दोघांचे नाही. तेव्हा आम्हाला मदत करणारे स्वयंसेवक पाहिजे आहेत. हे लोक स्वयंभू असले पाहिजेत." म्हणजे आपण होऊन पुढाकार घेऊन मदत करणारे! ज्या गोष्टींसाठी मदत लागते त्यांची काही उदाहरणे:

१. गावोगावी जाऊन 'उत्तररंग' मेळावे घेणे. तेथील लोकांना आपापले 'उत्तररंग' गट सुरू करण्यास मार्गदर्शन व मदत करणे.

२. महाजालाचा उपयोग करून ई-ग्रूप, ईमेल व महाजालावर व्याख्याने, मेळावे इत्यादी (वेबिनार) आयोजित करणे.

३. एकट्या माणसांना जोडीदार शोधण्यासाठी 'स्नेहबंध'चे मेळावे (प्रत्यक्ष वा महाजालावरील) आयोजित करणे.

४. बृहन्महाराष्ट्रवृत्तासाठी लेख लिहिणे. उत्तररंग सदरासाठी आणि अन्यही!

५. उत्तररंग नामदर्शिका प्रसिद्ध झाली आहे. त्यातील पत्ते बदलले असतील तर सुधारित माहिती आम्हाला पाठवणे.

६. आपल्या गावात उत्तररंग विषयावरील काही उपक्रम झाले, तर माहिती वृत्ताकडे पाठवणे.

७. आपापल्या गावात विविध प्रकारच्या निवृत्त वसाहती (Senior communities) असतात. त्यांना भेट देऊन, माहिती घेऊन, त्याबद्दलचे लेख वृत्तासाठी पाठवणे. आपापल्या मुलांजवळ जाऊन तेथील वसाहतीत राहण्याची गरज आपल्यासारख्या आईवडिलांना असते. ते अशा माहितीच्या शोधात असतात. उत्तररंग हे सदर अशा माहितीच्या देवाणघेवाणीसाठीही चालवले जाते.

**दिशा उत्तररंगाच्या:**

'व्यक्तिगत, गावाच्या आणि बृहन्महाराष्ट्रमंडळाच्या पातळ्यांवर या कामाचा आवाका किती आहे' याबद्दल माझा "वेध उत्तर रंगाचे" हा लेख प्रसिद्ध झाला आहे. तो लेख आमच्या गावातील 'विरंगुळा' मेळाव्यात वाचला होता. फिलाडेल्फियात अधिवेशनाला जोडून झालेल्या तीन तासांच्या परिषदेत मी याच विषयावर माझे विचार मांडले होते. ( कोणाला वाचावासा वाटला तर मला ईमेल पाठवा.) आवाका म्हणाल तर "स्काय इज द लिमिट!" पण तरीही मी पाच मिनिटे या विषयावर बोलले आणि चर्चा सुरू केली. मी मांडलेल्या काही कल्पना:

१. आपापल्या मुलाबाळांसाठी आपला वारसा म्हणून आपल्या लहानपणच्या आठवणी लिहून ठेवणे. उदाहरणार्थ, www.bookganga.com या संकेतस्थळावर 'नाती आणि स्मृती' हे पुस्तक विनामूल्य उपलब्ध आहे.

२. आपल्या मराठी मंडळाचा इतिहास लिहिणे. तरुण मंडळींसाठी तो मनोरंजकही होऊ शकतो.

३. प्रवास आणि स्वजन सेवा यांची सांगड घालणे. Volunteer tourism हा प्रकार अमेरिकन लोकांमध्ये लोकप्रिय आहे. 'एएआरपी'च्या अधिवेशनात या विषयावरील चर्चासत्र तुडुंब गर्दी खेचते.

४. कधीतरी आपली निवृत्त वसाहत होण्यासाठी प्रयत्न. यासंदर्भात मी 'शांतिनिकेतन' या फ्लोरिडातील भारतीय वसाहतीबाबत माहिती दिली. अशा वसाहती न्यूजर्सी आणि कॅलिफोर्नियामधे करण्याचा संकल्प आहे. त्याबद्दलच्या प्राथमिक बैठकी चालू आहेत.

आमचा तीन तासांचा हा मेळावा चांगलाच झाला. आम्हाला नवे मित्र मिळाले. 'अग्रणी'च्या सदस्यांना विचार आणि कृतीला खाद्य मिळालं. उत्तररंग सदरासाठी वृत्ताला नवे लेखक मिळाले. दहा लोकांनी नामदर्शिका विकत घेतल्या. असे मेळावे आणखी गावात घेण्याची इच्छा आहे. कोणी स्वयम्भू स्वयंसेवक पुढे आले तर ते होतीलही. अधिक माहितीसाठी संपर्क: vidyahardikar@gmail.com

**- विद्या हर्डीकर सप्रे** (लॉस अँजलिस, कॅलिफोर्निया)

## ई - विभाग

**Story: Kojagiri Magic -**
**By - Rajesh Pendurkar (Charlotte NC)**
**Kids' Corner: Story: A Good Shot -**
**By- Rajiv Tambe (Dombivali (E) MS, India)**
**राशिभविष्य: सप्टेंबर, २०१४ - दादा दामले** (न्यू जर्सी)
**वाचण्यासाठी संकेतस्थळ: click or visit-**
**http://www.bmmonline.org/vrutta-esahitya/**

## MATRIMONIAL

**Parents of Maharashtrian girl inviting correspondence from suitable bachelors.**

**Our daughter is born and raised in USA**
**After Graduation she held jobs in New York, and now finishing Masters degree from George Town University.**
**She is well travelled besides USA**

**She is 32 years, 5' 5" tall, beautiful and outgoing, healthy and never married.**

**Partner's preference:**
**Age 32-35 years, with Master's degree, Employed in finance, medical or other profession.**

**Please contact:**
**Vak20140@gmail.com**

## HEALTH INSURANCE

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

*** VISITORS**
*** H-1 B VISA HOLDERS**
*** PERMANENT RESIDENTS**
**( Some restrictions apply)**

**For more information:**

**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**


**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: **(800)204-1939**
E-mail: **padmajabapat@yahoo.com**
Website: **visitors-insurance.com**

## ।। व्याडेश्वर कुलस्वामी असलेली चित्पावन घराणी ।।


१. अभ्यंकर २. आपटे ३. आंबेकर ४. आठवले ५. आगाशे ६. आगरकर ७. आमडेकर८. उकिडवे ९. ओक १०. ओंकार ११. ओगले १२. कर्वे (शांडिल्यगोत्री) १३. किडमिडे १४. कानडे १५. काळे १६. कापरेकर १७. कार्लेकर १८. काशिकर १९. केळकर २०. खरे२१. खांबेटे २२. खाडिलकर २३. गद्रे २४. गणपुले २५. गानु (शांडिल्यगोत्री) २६. गोडबोले २७. गांगल २८. गोगटे २९. गोळे ३०. गोंधळेकर ३१. कानिटकर ३२. घांगुरडे ३३. घारपुरे ३४. घारे ३५. थत्ते ३६. दामले ३७. दातार ३८. दांडेकर ३९. दिवेकर ४०. देवल ४१. देवधर ४२. धारप ४३. नातू ४४. नरवणे ४५. नामजोशी ४६. नगरकर ४७. नेने ४८. परचुरे ४९. पोंक्षे ५०. पाटणकर ५१. पटवर्धन ५२. पर्वते ५३. पेंडसे ५४. फडणीस (शांडिल्यगोत्री) ५५. फडके ५६. फणसे ५७. राजवाडे ५८. बापट ५९. बागुल ६०. बोडस ६१. बाम ६२. भाटे ६३. भिडे ६४. भामे ६५. भातखंडे ६६. मोडक ६७. महाबळ ६८. मालशे ६९. माईल (शांडिल्यगोत्री) ७०. चितळे ७१. चिपळूणकर ७२. चक्रदेव ७३. जोग ७४. जाईल ७५. जोगळेकर ७६. जोशी (शांडिल्यगोत्री) ७७. रिसबुड ७८. लवाटे ७९. लिमये ८०. लोंढे ८१. लेले ८२. मराठे ८३. वाड ८४. वेलणकर ८५. विद्वांस ८६. वैद्य ८७. शिंत्रे ८८. विंझे ८९. व्यास (शांडिल्यगोत्री) ९०. शारंगपाणी ९१. शिधये ९२. साठे ९३. साठ्ये ९४. सावरकर ९५. सहस्रबुद्धे (शांडिल्यगोत्री) ९६. साने ९७. पेठे (शांडिल्यगोत्री) ९८. हुपरीकर ९९. भट


**ह्या शिवाय हेदवी, गणपती पुळे, हरिहरेश्वर, वेळणेश्वर हाकेच्या अंतरावर!**


BEACH HOTELS


BUNGALOWS / HOUSES

Mandke Lighthouse
Investment.Appreciation.Pleasure
GUHAGAR, KONKAN


NATUROPATHY & WELLNESS CENTRE


PARASAILING & WATER SPORTS

**www.sudhirmandke.com | info@sudhirmandke.com | Tel: +91-20-25652521**

बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408


# MAHARASHTRA FOUNDATION

Social & Economic Justice for All

*(NGO in Special Consultative Status with the Economic and Social Council of the United Nations)*

**Tax Exemption ID**
**Under IRS Section**
**501 (c)(3)**
**22-2213611**

**United Way NY, NJ, CT**
**Agency Code 011675**

**PO Box 2287,**
**Church Street Station,**
**New York,**
**NY 10008-2287**

## Annual Fund Raising Event
## in
## New Jersey, 8th November 2014: A Marathi Drama




**For Details, Visit: http://www.maharashtrafoundation.org**